माजी सैनिकांना शासन सेवेत वर्ग ३ व
वर्ग ४ च्या पदावर नियुक्तीसाठी सवलती.

---

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक -आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६अ,
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२, दिनांक :- ५ ऑक्टोबर, १९८९.

वाचा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : आयपीईआरटीए -१०८०/०/१८१/१६-अ, दिनांक १० ऑक्टोबर १९८०.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : आरटीए -१०७९/०/४८२/१६ अ, दिनांक १६एप्रिल १९८१.

## शासन निर्णय

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- आरटीए-१०७९/०/४८२/१६-अ, दिनांक १६.४.१९८१ मधील परिच्छेद २ (चार) (१)नुसार माजी सैनिकांना शासन सेवेत वर्ग ३ व ४ मधील राखीव पदावर नियुक्तीसाठी काही शैक्षणिक सवलती देण्यात आल्या आहेत.

२. केंद्र शासनाने माजी सैनिकांना सेवा भरतीसाठी नव्याने काही शैक्षणिक सवलती जाहीर केल्या आहेत, त्या धर्तीवर राज्यातील शासकीय विभाग व कार्यालयान्तर्गत तृतीय व चर्तुथ श्रेणीतील माजी सैनिकांसाठी असलेल्या १५% राखीव पदावर नियुक्तीसाठी सवलती देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता, त्यावर विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की,

(अ) १५ वर्षे सैनिकी सेवा झालेले माजी सैनिक जे एस.एस.सी. उत्तीर्ण असतील किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र धारक असतील, तर ज्या पदासाठी पदवी परीक्षाही पात्रता आवश्यक आहे आणि जेथे तांत्रिक अथवा व्यवसायिक कामांचा अंनुभव आवश्यक ठरविलेला नाही, अशा पदावर त्यांची सदरची शैक्षणिक पात्रता शिथिल करुन नेमणुकीसाठी विचार करावयास हरकत नाही.

(आ) १५ वर्षे सैनिकी सेवा झालेले माजी सैनिक, जर इयत्ता ८ वी उत्तीर्ण असतील किंवा इंडियन आर्मी फस्ट क्लास सर्टिफिकेटऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र धारक असतील, तर ज्या पदासाठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ही पात्रता आवश्यक आहे अशा पदावर त्यांची सदरची शैक्षणिक पात्रता शिथिल करून नेमणुकीसाठी विचार करावयास हरकत नाही.

३. सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील विविध विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना माजी सैनिकांना नेमणुका देताना वरील निर्णय विचारात घ्यावा. मंत्रालयीन विभागांनी हे आदेश त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील संबंधित शासकीय उपक्रम, महामंडळे, औद्योगिक संस्था, जिल्हा परिषदा, महापालिका इत्यादींच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालाचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्र्याचे कार्यालय,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
प्रबंधक, मूळ न्याय शाखा,उच्च न्यायालय, मुंबई.(पत्राने)
प्रबंधक, अपील शाखा,उच्च न्यायालय, मुंबई.(पत्राने)

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.